दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | शनिवार, 21 मार्च 2026 | अंक क्र. 301 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com







# खरातला गुरु मानलं होतं, पण...

## राजीनाम्यानंतर रुपाली चाकणकरांनी स्पष्ट केली भूमिका
## अनामिका कापल्याच्या आरोपावरही दिलं प्रत्युत्तर



■ मुंबई वृत्तसंस्था

रुपाली चाकणकर यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. अशोक खरात प्रकरणानंतर वाढलेल्या वादामुळे गेल्या काही दिवसांपासून चाकणकर यांच्यावर टीकेची झोड उठली होती आणि त्यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरत होती. अखेर काल रात्री रुपाली चाकणकर यांनी आपला राजीनामा राष्ट्रवादीच्या सर्वेसर्वा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे सुपूर्द केला आहे. यानंतर त्यांनी माध्यामांशी संवाद साधत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. माध्यमांकडून दाखवले जाणारे व्हिडीओ हे काही वर्षांपूर्वीचे आहेत. गुरुपौर्णिमोच्यानिमित्ताने पाद्यपूजा अनेकांनी केली, तशी मी आणि माझ्या पतीनेही केली. खरात पती-पत्नीला मी आणि माझ्या परिवाराने गुरु मानलं होतं. तिथे होणाऱ्या कार्यक्रमांना आम्ही उपस्थित राहायचो. यामध्ये एखाद्या व्यक्तीला आपण गुरु मानलं, त्यानिमित्ताने आम्ही कुटुंब उपस्थित राहत होतो. पाच-सहा वर्षांपूर्वी आपण ज्या व्यक्तीच्या संपर्कात असतो, ते पाच-सहा वर्षांनी एखाद्याचे कृत्य, वैयक्तिक वागणूक, वैयक्तिक आयुष्य याबद्दल आपल्याला सुतराम कल्पना नसते. आज जे आपल्यासोबत आहेत, ते उद्या पुढे जाऊन कसं वागतील, ही कल्पना आपल्या कोणाला नसते. त्यामुळे मी ही घटना समजल्यावर मला धक्का बसला," असे रूपाली चाकणकर यांनी "मी लगेच ट्विटही केलं. या देवस्थान ट्रस्टशी माझ्या कुटुंबाचा संबंध आहे. शिवनिका संस्थानमध्ये मी प्रदेशाध्यक्ष होते, तेव्हापासून सदस्य म्हणून ट्रस्टवर काम केले आहे. माझ्यासमवेत समाजातील अनेक प्रतिष्ठित नागरिक, मान्यवर या ट्रस्टवर होते. मी ट्रस्टची सदस्य होते, त्यानंतर मी महिला आयोगाची अध्यक्ष झाले. या ट्रस्टचा कार्यकाळ 8 ऑगस्ट 2025 रोजी संपुष्टात आला होता. माझं संपूर्ण कुटुंब हे वारकरी संप्रदायातील आहे. आमची खरातवर असणारी श्रद्धा अध्यात्मिक दृष्टीकोनातून होती. त्यामुळे खरातच्या ट्रस्टसोबत जोडले गेले. परंतु, खरातची दुसरी बाजू मला माहिती नव्हती. जे काही कृत्य घडलंय ते अत्यंत चुकीचं आहे, घाणेरडं असून त्याचं आम्ही कुठेही समर्थन करणार नाही. पोलिसांनी त्याचा तपास करुन आरोपीवर कठोर कारवाई करावी," अशी मागणीही यावेळी चाकणकरांनी केली. माझ्यासारख्या अनेक लोकांचे फोटो खरातसोबत आहेत. परंतु एक महिला म्हणून माझ्यावर आरोप करण्यात आले याचं वाईट वाटतं, अशी खंत रुपाली चाकणकर यांनी व्यक्त केली.



## अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत करा

### ना. पंकजाताई मुंडेंचे जिल्हा प्रशासनाला निर्देश ; नुकसानीची घेतली माहिती

■ बीड प्रतिनिधी

जिल्हयात काल आणि परवा गारपिटीसह झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळवून देण्याचे निर्देश राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची ना. पंकजाताई मुंडे यांनी प्रशासनाकडून सर्व माहिती घेतली. बीड, वडवणी, आष्टीसह अन्य तालुक्यालाही कमी अधिक प्रमाणात याचा फटका बसला आहे.शेतातील उभ्या पिकांचे नुकसान झाले आहे. आंबा, टरबूज, मोसंबी या फळबागांचे तर गहू, हरभरा, ज्वारी, कांदा पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. मळणीसाठी काढून ठेवलेली पिके भिजल्याने त्याचेही नुकसान झाले आहे. अवकाळीमुळे शेतकऱ्यांवर आलेले संकट पाहता या सर्व नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत असे निर्देश देऊन शासनाच्या संबंधित विभागाकडून मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू असे ना. पंकजाताई मुंडे यांनी म्हटले आहे.





## रामनगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी जाहीर

■ परळी (प्रतिनिधी)

रामनगर लिबोनी येथील बौद्ध विहारात महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त उत्सव समितीची बैठक रविवारी (दि. 15 मार्च) उत्साहात पार पडली. या बैठकीस रामनगर येथील जेष्ठ नागरिक आयु. सुभाष कांबळे, माणिक वाघमारे, मारुती बदने, वैजनाथ वाघमारे, ज्ञानेश्वर ढगे, अरुण ठेंगे, दिलीप जगताप, मच्छिंद्र ठेंगे, रवि ढगे आदींचे मार्गदर्शन लाभले. बैठकीत जयंती उत्सव समितीची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. अध्यक्षपदी कुंडलीक (बाबा) कांबळे, उपाध्यक्षपदी विशाल चव्हाण तर सचिवपदी गोविंद सरवदे यांची निवड करण्यात आली. तसेच मार्गदर्शक मंडळात गुनाजी कांबळे, भास्कर सरवदे, राजभाऊ बावणे, शरद वाघमारे, चंद्रकांत वाघमारे, लालासाहेब वाघमारे, लक्ष्मण कांबळे, कृष्णा बावणे, गौतम जगताप, अंकुश नाईकवाडे, मनोज कांबळे, नवनाथ आचार्य, गोविंद आचार्य, निरंजन लटपटे, वैजनाथ वाघमारे, सुभाष लहाने यांचा समावेश करण्यात आला.

याशिवाय रोहित वाघमारे, संतोष ठेंगे, राहुल वाघमारे, आदित्य ढगे, आकाश चव्हाण, अनिकेत ढगे, साहिल चव्हाण, अभिषेक ढगे, बालाजी सरवदे, अशोक ढगे, कन्हैया ढगे, सचिन ठेंगे, रमेश फड, राहुल जंगले, आकाश कांबळे, विकास कांबळे, भागवत जगताप, पाराजी कांबळे, सोहम चव्हाण आदींचीही विविध पदांवर निवड करण्यात आली. दरम्यान, यंदाची 135 वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्याचा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला असून या निमित्ताने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

## डिघोळआंबा येथे महिलांसाठी रोजा इफ्तार
## सामाजिक कार्यकर्ते अक्षय भुंबे यांच्या पुढाकाराने आयोजन

■ अंबाजोगाई (प्रतिनिधी)

मुस्लीम धर्मियांचा पवित्र रमजान महिना सुरू असून, उपवास सोडण्यासाठी बुधवारी डिघोळआंबा येथे महिलांसाठी रोजा इफ्तारचे आयोजन करण्यात आले होते. सर्वधर्मियांचे धार्मिक प्रसंग एकत्र साजरे करून सामाजिक सलोखा वाढविण्याच्या उद्देशाने सामाजिक कार्यकर्ते अक्षय भुंबे यांच्या पुढाकाराने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी रोजा इफ्तारचे आयोजन करण्यात आले. यात जवळपास १५० महिला आणि २०० पुरूष सहभागी झाले होते. यावेळी भुंबे परिवाराकडून २१ विधवा भगिनी आणि ५ दिव्यांगांना जीवनावश्यक १५ वस्तू, ड्रायफ्रूट, साखर व तेल या वस्तूंचे किट वाटप करण्यात आले.

डिघोळआंबा येथे बुधवार, दिनांक १८ मार्च २०२६ रोजी आयोजित रोजा इफ्तार कार्यक्रमात खजूर, फळे, ड्रायफ्रूट आदींसह रूचकर पदार्थांचा आस्वाद उपस्थितांनी घेतला. यावेळी आयोजक अक्षय भुंबे, व डिघोळआंबा गांवचे उपसरपंच बालाजी आबा मुळे, दीपक शिंदे, जीवन गायकवाड, अरूण बनसोडे, पोलीस पाटील पप्पू माके, आनंद कांबळे, अमोल खरात, सोमा वैरागे, रामराजे सावंत, मिलिंद खरात, बिभीषण गुंडरे, नवनाथ लेमटे, राहुल भुंबे, शेख रहीम नूर शेख आदींसह सर्वधर्मीय समाज बांधव, महिला भगिनी, युवक उपस्थित होते. रोजा इफ्तारच्या आयोजनाबाबत बोलताना अक्षय भुंबे यांनी सांगितले की, देशाला आज सर्वधर्मसमभाव, सामाजिक सलोख्याची नितांत गरज निर्माण झाली आहे. मुस्लिम धर्मियांच्या या पवित्र महिन्यात, त्यांच्या सणात आपणही सहभागी होवून त्यांचा आनंद द्विगुणित केला पाहिजे.

या विधायक हेतूने या भागातील मुस्लिम भगिनींसाठी रोजा इफ्तारचे आयोजन केले आहे, ग्रामीण भागामध्ये सामाजिक सलोखा रूजला पाहिजे यासाठी आम्ही प्रयत्न करीत राहू असे भुंबे यांनी सांगितले. रमजाननिमित्त डिघोळआंबा येथे महिलांसाठी भुंबे यांच्या पुढाकाराने अत्यंत चांगल्या प्रकारे रोजा इफ्तारचे आयोजन करण्यात आले होते. मुस्लिम महिला भगिनींनी त्याला चांगला प्रतिसाद दिला.





### ग्रामीण भागामध्ये सामाजिक सलोखा रूजला पाहिजे

■ आपल्या देशाचे संविधान ज्या चार प्रमुख तत्वांवर आधारित आहे. त्यातील एक म्हणजे समानता हे होय, आपल्याकडे अनेक रोजा इफ्तारचे कार्यक्रम आयोजित केले जातात, यामध्ये महिलांचा सहभाग अत्यल्प असतो, त्यामुळे महिलांसाठी देखील हा उपक्रम राबवून एक दिवस त्यांना देखील इफ्तारची दावत देण्यात यावी या विधायक भावनेतून दरवर्षी प्रमाणेच याही वर्षी हा उपक्रम आयोजित करण्यात आला. हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शिख, ख्रिश्चन, जैन, लिंगायत समाजात ऐक्य व सौहार्द टिकविणे, तो वाढविणे, तसेच मुस्लिम महिला भगिनींना विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी रोजा इफ्तार सारखे उपक्रम हे अत्यंत उपयुक्त ठरतात. ग्रामीण भागामध्ये सामाजिक सलोखा रूजला पाहिजे म्हणून मुस्लिमेत्तर बांधवांनी पुढाकार घेऊन असे उपक्रम राबविले पाहिजेत. बहुतेक वेळा मुस्लिम पुरूषांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन केले जाते. पण, महिलांसाठी मात्र तसे होत नाही. त्यामुळे महिलांना देखील अशा उपक्रमात सहभागी करून घेतले पाहिजे याच विधायक हेतूने आपण पुरूष व महिला दोन्हींसाठी पण रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते.

■ - अक्षय भुंबे (सामाजिक कार्यकर्ते)





# सांगली जिल्ह्यात जिल्हा परिषद शाळांची गुढी उंच !

## गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर ११११४२ विद्यार्थ्यांनी घेतला जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेश !

सांगली जिल्हा परिषदेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या गुढीपाडवा पट वाढवा या अभियानास पालकांच्यातून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. जिल्ह्यातील ६१% पालकांनी आपली मुले जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकवण्यास प्राधान्य दिले आहे. संपूर्ण सांगली जिल्ह्याच्या इयत्ता पहिलीच्या पटनोंदणी सर्वेतील १८२८१ विद्यार्थ्यांपैकी ११११४२ विद्यार्थ्यांनी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेश घेतला आहे.

सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे आणि प्राथमिकचे शिक्षणाधिकारी मोहनराव गायकवाड यांच्या मार्गदर्शन आणि सुयोग्य नियोजनातून हे अभियान संपूर्ण सांगली जिल्ह्यात ताकदीने सुरू आहे. यामुळे गेली तीन-चार वर्षे जिल्हा परिषद शाळेकडे पालकांचा ओढा वाढताना दिसत आहे. सन २०२४-२५ मध्ये दाखलपात्र विद्यार्थ्यांपैकी ५१% विद्यार्थी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत दाखल झाले होते. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात त्यामध्ये वाढ होऊन, पट नोंदणी सर्वेतील ५४% विद्यार्थी शाळेत दाखल झाले होते. यावर्षी म्हणजेच सन २०२६-२७ मध्ये इयत्ता पहिलीच्या प्रवेशात आणखी वाढ होऊन दाखल पात्र सर्वेतील ६१% विद्यार्थी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर इयत्ता पहिली दाखल झाले आहेत.

डिजिटल वर्ग खोल्या, ई लर्निंग ची सुविधा, सीबीएसई अभ्यासक्रमाची सुरुवात, स्पर्धा परीक्षेसाठी विशेष मार्गदर्शन, तज्ञ आणि प्रशिक्षित शिक्षक वर्ग, विविध उपक्रमांची यशस्वी अंमलबजावणी, गॅदरिंग जिल्हा परिषद शाळांच्या अशा अनेक वैशिष्ट्यांमुळे जिल्हा परिषदेच्या शाळांमधून विद्यार्थी संख्या वाढताना दिसत आहे. विटा, तासगाव, कडेगाव, शिराळा या तालुक्यात दाखलपात्र विद्यार्थ्यांची टक्केवारी खूपच चांगली म्हणजे ७३ ते ७५ टक्केपर्यंत आहे.

गुढीपाडव्याच्या दिवशी संपूर्ण सांगली जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांचे वेगवेगळ्या पद्धतीने उत्साहात स्वागत करण्यात आले. अनेक ठिकाणी गुलाबाची फुले, खाऊ वाटप करून, तर काही ठिकाणी शोभायात्रेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. अनेक शाळांमध्ये नव्याने प्रवेश घेणाऱ्या बालकांच्या पहिल्या पावलांचे ठसे, पाटीपूजन, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन, प्रार्थना, पुस्तकांची गुढी असे विविध उपक्रम राबवण्यात आले. अनेक ठिकाणी विविध पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, अधिकारी, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरे करण्यात आले.

संपूर्ण सांगली जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधून २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता पहिलीचे वर्ग मार्चमध्येच सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती सांगली जिल्हा परिषदेचे प्राथमिकचे शिक्षणाधिकारी मोहनराव गायकवाड यांनी दिली आहे.

सांगली जिल्हा परिषद, जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन सातत्याने करत असते. इयत्ता चौथी सातवी साठी डॉ. पतंगराव कदम गुणवत्ता चाचणी आणि इयत्ता पहिलीपासून आठवीपर्यंतच्या सर्व वर्गांसाठी गुणवत्ता चाचणी दरवर्षी घेतली जाते. त्यामुळे या शाळांतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा आलेख सातत्याने वाढताना दिसत आहे. याचबरोबर विद्यार्थ्यांच्या कलागुणांना, क्रीडागुणांना वाव मिळावा यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन दरवर्षी शाळा, केंद्र, तालुका आणि जिल्हास्तरावर करण्यात येत आहे. यशस्वी आणि गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन प्रोत्साहित केले जात आहे. या सर्वांमुळे जिल्हा परिषदेतच्या शाळांचा दर्जा वाढताना दिसत आहे.

| तालुका | दाखल पात्र विद्यार्थी | प्रवेश घेतलेली विद्या | शेकडा |
|---|---|---|---|
| विटा | 784 | 590 | 75.25 |
| तासगाव | 1745 | 1313 | 75.24 |
| कडेगांव | 1022 | 775 | 73.56 |
| शिराळा | 775 | 570 | 73.54 |
| आटपाडी | 1182 | 807 | 68.27 |
| जत | 3664 | 2433 | 66.4 |
| मिरज | 3072 | 1850 | 60.22 |
| पलूस | 949 | 458 | 48.36 |
| कवठेमहांकाळ | 1683 | 788 | 46.73 |
| वाळवा | 3402 | 1559 | 45.82 |

मॉडेल स्कूल चळवळीमुळे जिल्हा परिषद शाळांमध्ये भौतिक सुविधांची उपलब्धता झाल्यामुळे तिथे शैक्षणिक गुणवत्ताही वाढत आहे. इंग्रजी माध्यमातील विद्यार्थीही पुन्हा मराठी माध्यमाकडे आणि जिल्हा परिषदेच्या शाळांकडे वळताना दिसत आहेत. त्यामुळे संपूर्ण सांगली जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या शाळांची गुढी उंच असल्याचे दिसत आहे. त्यामुळे पुढील काळात जिल्हा परिषदेच्या शाळांमधून बालचमुंचा किलबिलाट अधिक वाढणार आहे, हे निश्चित !

**– शब्दांकन दीपक रोकडे सर, जि.प.शाळा काळमवाडी, सांगली, ९७५७६५२२२४**


# "सोडूनिया गेली आई आम्हा लेकरांना, आई आई आता म्हणू मी कोणाला ? ?"

15 मार्च 2026 ची रात्र आमच्यासाठी काळरात्र ठरली. रात्री 11.45 वाजता मला बोलत बोलतच अगदी ध्यानीमनी नसताना अचानक आईने माझ्या हातावर मान टाकली आणि आम्हाला पोरके करून निघून गेली. जोपर्यंत तिचे पाय सुस्थितीत होते तोपर्यंत दररोज सकाळी सहा वाजता वैद्यनाथाचे दर्शन घेऊन ती घरी परत येत असे. प्रभू वैद्यनाथाची निस्सीम भक्त असलेली आई ऐन एकादशीच्या दिवशी गेली.व प्रभु वैद्यनाथाच्या सोमवारीच तिने इहलोकीची यात्रा संपवली.

आई जेव्हा सोडून जाते तेव्हा घराच्या भिंती उभ्याच असतात पण घराचा आधार कोसळलेला असतो.तिचा आवाज थांबतो पण प्रत्येक कोपऱ्यात तिची आठवण बोलत राहते. स्वयंपाक घरात स्वयंपाक होतो पण अन्नाला चव राहत नाही.अंगणात तिच्या पाऊल खुणा असतात.

पण मायेची ऊब संपून जाते.

आई गेल्यावर कळते की ती फक्त एक माणूस नव्हती तर ती एक सवय होती, ती अपार सुरक्षिततेची खात्री होती. आजारी पडलो की प्रचंड काळजी करणारी, चुका केल्या तरी मोठ्या मनाने माफ करणारी आणि स्वतःच दुःख गिळून आपल्यासाठी हसणारी ती माऊली होती. तिच्या अनुपस्थितीत जगातील व्यवहार चालू राहतात पण मन स्तब्धपणे थांबते. लोक म्हणतात "वेळ" सगळं भरून काढते,पण आईच्या प्रेमाला उपमा नाही, आईची उणीव कोणीच भरून काढू शकत नाही. तिचं जाणं म्हणजे नात्याचं संपण नसतं तर आयुष्यभराची एक शांत पोकळी असते. जी कधीच भरून निघू शकत नाही. पाच सहा महिन्यापूर्वी सर्दी, खोकला, कफ झाल्याचे निमित्त झाले. सर्व अवयव नव्वदितले त्यामुळे क्षीण झालेल्या शरीराला तो आजार तिला परावलंबी करून गेला. तिला तिचेच स्वतः पाय उचलणे सुद्धा अशक्य झालं. तिच्या संवेदना कमी झाल्याने सगळे सोपस्कार ती कपड्यातच करू लागली. 'वृद्धत्वामुळे 'आलेली कमजोरी सोडून दुसरा कोणताही आजार तिला नव्हता. सल्ला मसलतीचा पाऊस पडला. लाख मोलाच्या आईसाठी काही हजारांची केअरटेकर??? मनाला हे पटेचना .अनेक पर्यायांचा उहापोह झाला .सौ राधा (माझी पत्नी) नोकरी वाली. मग मीच ठरवलं केअरटेकर आपणच व्हायचं." आईची आई" व्हायचं .नाही तरी सेवानिवृत्तीमुळे माझ्याकडे वेळच वेळ होता. सकाळी तिला उठवून लघवीची पिशवी रिकामी करणे, प्रातःविधी उरकणे, स्वतः तिचे दात घासणे, आम्ही उभयताने बाथरूम मध्ये उचलून नेऊन अंघोळ घालणं, अंगाला मलम लावणे, औषध गोळ्या देणं, डायपर बदलणं हा आमचा नित्यक्रम झाला. सकाळी चमच्याने पाजलेला चहा, फळांचा रस, राग राग करून भरवलेले काऊ चिऊचे घास .त्यातच कधी ठसका, तर कधी मळमळ, कधी उलटी तर कधी लहान लेकरासारखं तिचं गच्च तोंड बंद करून ठेवणे ,त्यामुळे आम्हा उभयंताची फार धावपळ होत होती. पण थकवा





आला तरी जाणवत नव्हता. तिच्या प्रत्येक हाकेमुळे मनातल्या मनात कदाचित माझाही पान्हा फुटत असावा .मनाच्या कुठल्याही पातळीवर कधीही न मिळालेलं समाधान मी अनुभवत होतो .कुठल्याही कळा न सोसता मला तिचं "आई" पण मिळालं हे माझं किती मोठं भाग्य होतं .काही महिन्यांचीच सेवा झाली आणि एकादशीच्या पावन दिवशी माझ्या हिरकणीने गड सोडला.

मी माझं कर्तव्य समजून तिची सेवा केली .कुणीतरी म्हणालं "पुण्य कमावलंस" पण खरं सांगू? तिने आमच्यासाठी आयुष्यभर जे केलं त्यापुढे हे सर्व शून्यच.

देव आणि आई एकाच नाण्याच्या दोन बाजू ,देव खाली येऊ शकत नाही म्हणून त्याने आईला पृथ्वीवर पाठवलं ,असं कुठेतरी मी वाचलेलं होतं. त्या वाक्याचा प्रत्यय यावा अशीच माझी आई . रामची असो की शामची, कैकयीची असो की गांधारीची,आई सगळ्यांची सारखीच. शरीराने आणि मनाने आपल्या गूढ देवराईतील शक्ती देवता .फक्त आपल्या मुलांच्या भल्यासाठीच तिच्या ओंजळीतील माया रिकामी करणारी लक्ष्मीच ती. प्रत्येकाच्या छोट्याशा आकाशातील आढळ स्थानावरील ध्रुवतारा. तिचं गुरुत्वाकर्षण तर पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणापेक्षाही भारी .खालून वर नेणार. बिजांडातून ब्रम्हांडात पोहोचवणार .तिच्या बिजांडात अंकुरलेला सूक्ष्म कोंब म्हणजे आपण. माता कुराणातील असो वा पुराणातील, तिचं वात्सल्य कुणालाही नतमस्तक व्हायला लावते. अनुसया असो की आदिती, दिगंबराची असो किंवा पैगंबराची, आई शेवटी आईच असते .प्रत्येक जन्माला आलेल्या बाळासाठी तिचं व त्याचं नातं अद्वैत . सर्वत्र फिरलो पण तिच्या उपकारांची परतफेड करणाऱ्या वस्तूंचा मॉल कधी मला दिसला नाही. डेबिट कार्ड ,क्रेडिट कार्ड ,पासबुक, एफडी ही या नात्यात फक्त कागद आहेत. आईचं कर्ज फेडण्या इतका त्यात बॅलेन्स कुठे आहे?

स्वतः अशिक्षित असूनही तिने तिची पाचही अपत्य एकापेक्षा एक सरस असेच घडवले.एक प्राध्यापिका, एक बँक अकाउंटंट, एक बँकेचा जनरल मॅनेजर, एक प्राचार्य, तर एक माध्यमिक शिक्षिका.आज तिची सहा नातवंड डॉक्टर आहेत, काहीं इंजिनीयर आहेत. आज तिच्या मायेचा वटवृक्ष फार मोठा बहरलेला आहे. तिच्या आजारपणात माझी लेक डॉ. ऋचा व जावई डॉ. सागर, आमचे भाऊजी श्री प्रभाकर दिक्कतवार व त्यांची मुले डॉ मेघमल्हार व डॉ श्रुती यांची झालेली वैद्यकीय मदत याचा उल्लेख केला नाही तर तो उपमर्द ठरेल. तिच्या आजारपणात माझ्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक सोपस्कार अगदी मनापासून न कंटाळता स्वतः ची आई समजून केलेल्या सेवेबद्दल माझी अर्धांगिनी सौ. राधा च्या सहकार्याला मनापासून सलाम... आईच्या ऋणातून किंचित मुक्त होण्याचा उतराई होण्याचा हा एक मार्ग... ..... आपणही शक्य असेल तेव्हा जरूर बना.. "आई ची आई"

**– रमेश कोमावार, सेवानिवृत्त शिक्षक. परळी वैजनाथ.9422244882.**

## २१ मार्च आंतरराष्ट्रीय वन दिवस

# देशासह राज्यातील वनक्षेत्राताची घट अत्यंत चिंताजनक

जगातील वन क्षेत्र संरक्षित रहावे व जंगलातील संपूर्ण जीवजंतूंचे संरक्षण व्हावे या उद्देशाने संयुक्त राष्ट्र महासभाने २०१२ ला २१ मार्च हा दिवस "आंतरराष्ट्रीय वन दिवस" साजरा करण्याची घोषणा केली.तेव्हापासुन जगात २१ मार्चला आंतरराष्ट्रीय वन दिवस साजरा केला जातो.राष्ट्रीय वन अहवाल २०२३ च्या माहितीनुसार वनक्षेत्राच्या बाबतीत देशासह राज्याची परिस्थिती अत्यंत चिंताजनक स्थितीत येवून ठेपली आहे.कारण देशात फक्त २१ टक्के व राज्यात फक्त १६ टक्के वनक्षेत्र शिल्लक असल्याचा खुलासा राष्ट्रीय वन अहवालात केला आहे ही अत्यंत गंभीर व धोकादायक बाब आहे.आज निसर्गावर सर्वंच काही अवलंबून आहे.आज निसर्ग आहे म्हणून सृष्टी आहे. निसर्गाची संपूर्ण जळमुळ वनक्षेत्रावर अवलंबून असते.वनक्षेत्र म्हणजेच वृक्ष,परंतु आज वनक्षेत्रावर संपूर्ण मानवजातीने स्वतःच्या स्वार्थासाठी कुऱ्हाड चालवून घनाघाती प्रहार केला आहे.आज देशाचा विचार केला तर फक्त २१ टक्के वनक्षेत्र आहे म्हणजे मानवजातीसह संपूर्ण जीवसृष्टीसाठी धोक्याची घंटा आहे. घटत्या वनक्षेत्रामुळे हवामानात बदल होवून ग्लेशियर वितळणे,भुकंप, ज्वालामुखीचा उद्रेक,भुस्खनन, अती उष्णता, अती पाऊस, सुनामी, समुद्राची पातळी वाढणे अशा भयावह घटना दिवसेंदिवस वाढतच आहे. आजच्या परिस्थितीत आंतरराष्ट्रीय नियमांनुसार प्रत्येक देशाचे वनक्षेत्र कमीत कमी ३३ टक्के असने गरजेचे आहे.परंतु आज भारतात फक्त २१ टक्के वनक्षेत्र शिल्लक असल्याचे सांगितले जाते व महाराष्ट्राचा विचार केला तर फक्त १६ टक्के वनक्षेत्र शिल्लक आहे. म्हणजेच राज्यासह देशातील वनक्षेत्र भरपूर पिछाडीवर आहोत.महाराष्ट्रात फक्त १६ टक्के वनक्षेत्र म्हणजे मोठी धोक्याची घंटा आहे.देहरादून येथील "फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडिया" या संस्थेने नुकताच २०२३ चा राष्ट्रीय वन अहवाल (आयएसएफआर) दिल्ली येथील वन आणि पर्यावरण मंत्रालयाकडे सादर केला.हा अहवाल देशातील वनसंपत्ती आणि संसाधनावरील प्राथमिक माहितीच्या आधारावरचा मूल्यांकन अहवाल मानला जातो.वनक्षेत्राच्या बाबतीत देशातील राज्यात समतोल नसल्याने वनक्षेत्र घटतांना दिसते. आज आपण पहाले तर देशातील आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ,ओरिसा, तेलंगणा,या राज्यातील वनक्षेत्र गेल्या दोन वर्षांत वाढले आहेत.तर घनदाट जंगलाच्या बाबतीत ज्या राज्यांची गनणा होते अशा मिझोराम, नागालँड, अरूणाचल प्रदेश, त्रिपुरा, मेघालय या राज्यातील वनक्षेत्र घटले आहे ही चिंतेची बाब आहे.इतर राज्याच्या तुलनेत जर महाराष्ट्राचा विचार केला वनक्षेत्राच्या बाबतीत अत्यंत निचकांक असुन गंभीर परिस्थितीत असल्याचे दिसून येते.त्यामुळे वनक्षेत्राच्या बाबतीत सरकारने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.कारण वनक्षेत्रावर संपूर्ण मानवजाती, पशुपक्षी व जीवजंतू यांची दिनचर्या अवलंबुन असते.त्यामुळे वनक्षेत्र सुरक्षित तर संपूर्ण जीवसृष्टी सुरक्षिर हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारा पाहिजे.आज संपूर्ण देशाचा विचार केला तर वनक्षेत्र ३३ टक्क्यांपर्यंत आणण्यासाठी १२ टक्के वनक्षेत्र वाढविण्याकरिता संपूर्ण ताकदीनिशी सरकारने व सामाजिक संघटनांनी पुढाकार घेतला पाहिजे.त्याचप्रमाणे आज राज्यात ३३ टक्क्यांपर्यंत वनक्षेत्र आणण्यासाठी १७ टक्के वनक्षेत्र वाढविण्याची मोठी जबाबदारी राज्य सरकारने स्विकारली पाहिजे. वनक्षेत्र वाढले नाही तर दिवसेंदिवस बदलत्या हवामानात आणखी भर पड्डुन भयावह परिस्थिती निर्माण होऊ शकते याला नाकारता येत नाही. त्यामुळे वृक्ष लागवड काळाची गरज आहे. आज घटत्या वनक्षेत्रामुळे जंगली पशुपक्षी याचे हाल बेहाल होत आहे व त्यांचे जगने अत्यंत कठीण झाले आहे.आपण रोज मिडियाच्या माध्यमातून पहात असतो की,गावात, शहरात, कोणाच्या घरात,रोडवर हिंसक प्राणी(वाघ, बिबट्या,अस्वल इत्यादी) मोठ्या प्रमाणात वावरतांना दिसतात.याला संपूर्ण मानवजाती जबाबदार आहेत.देशात हत्ती कर्नाटक व ओरिसा राज्यात सर्वाधिक आहे म्हणजेच जगभरात असणाऱ्या हत्ती पैकी ६० टक्क्यांहून अधिक हत्ती भारतात आहे. परंतु जंगल कटाईमुळे व वनक्षेत्राच्या घटत्या परिणामामुळे हत्तीचे कळप आपल्याला इतरत्र राज्यात येतांना दिसतात.यामुळे या महाकाय प्राण्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.जंगल कटाईमुळे वन्यप्राण्यांची तस्करी मोठ्या प्रमाणात वाढली आहे.ओडिशात गेल्या ११ वर्षांत ८५७ हत्तींचा मृत्यू अपघात, आजार, शिकार , विजेता झटका यामुळे त्यांचा मृत्यू झाला. अशाप्रकारे वन्यप्राण्यांवर मानवी अत्याचार वनक्षेत्र घटल्याने होत असल्याचे दिसून येते.घटत्या वनक्षेत्रामुळे हवामानात बदल होवून देशातील प्रदुषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. अमेरिकेच्या हेल्थ इफेक्ट इन्स्टिट्यूटने "स्टेट ऑफ ग्लोबल एअर २०२४ " हा अहवाल सादर केला आहे.त्यात दावा करण्यात आला आहे की भारतातील वायुप्रदूषण अतिशय चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे. वायुप्रदुषणामुळे जगभरातील मृत्यूच्या तुलनेत २५ टक्के मृत्यू भारतात होतात म्हणजेच भारत वायुप्रदूषणच्या बाबतीत अग्रेसर असल्याचे दिसून येते आणि ही गंभीर बाब आहे याला रोखण्यासाठी वनक्षेत्र वाढविण्याची नितांत गरज आहे व संपूर्ण स्तरातुन वृक्षलागवड मोहीम युद्धपातळीवर राबविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे गरजेचे आहे. जय हिंद!



लेखकः रमेश कृष्णराव लांजेवार ( स्वतंत्र पत्रकार )

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# सर्वसामान्य अशा ग्रामीण पार्श्वभूमीतून वाटचाल करत यश: डॉ. स्वप्नील सानप यांचे एमबीबीएसचे स्वप्न पूर्ण



**कडा । प्रतिनिधी**

अत्यंत प्रतिकूल आणि सर्वसामान्य अशा ग्रामीण पार्श्वभूमीतून वाटचाल करत डॉक्टर होण्याचे बाळगलेले स्वप्न प्रचंड चिकाटी, कष्ट आणि ध्येयनिष्ठेतून साकार करणाऱ्या युवकाची कहाणी आज संपूर्ण परिसरात प्रेरणादायी ठरत आहे. डॉ. स्वप्नील महादेव सानप यांनी नुकतीच एमबीबीएस ही वैद्यकीय क्षेत्रातील महत्त्वाची पदवी संपादन करून आपल्या दीर्घकाळच्या स्वप्नपूर्तीचा आनंद मिळवला आहे. परदेशात शिक्षण पूर्ण करून ते नुकतेच आपल्या मूळ गावी बीड जिल्ह्यात परतले असून, सोमवारी त्यांचा जिल्ह्यातील शिक्षणप्रेमी आणि मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

डॉ. स्वप्नील हे ज्येष्ठ मुख्याध्यापक महादेवराव (एम.बी.) सानप आणि आदर्श शिक्षिका वर्षाताई सानप यांचे सुपुत्र आहेत. त्यांची कन्या (बहीण) आणि जावाई (पत्नी) या दोघीही डॉक्टर असल्याने हे कुटुंब अक्षरशः डॉक्टरांचे कुटुंब बनले आहे. प्राथमिक शिक्षणापासूनच शिस्तप्रिय, शांत, मेहनती आणि अभ्यासू विद्यार्थी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डॉ. स्वप्नील यांच्या यशाचा आढावा घेताना त्यांचे वडील एम.बी. सानप म्हणाले, "मुलाने आपल्या मेहनतीच्या बळावर हे यश मिळवले आहे. त्याच्या स्वप्नपूर्तीचा आनंद शब्दातीत आहे. शिक्षक म्हणून आम्हाला त्याचा अभिमान आहे."

याप्रसंगी भावना व्यक्त करताना डॉ. स्वप्नील सानप म्हणाले, "हे यश माझ्या पालकांच्या आशीर्वादामुळे आणि मार्गदर्शकांच्या प्रेरणेमुळे शक्य झाले. भविष्यात मी पदव्युत्तर शिक्षण (एमडी/एमएस) पूर्ण करून सर्वसामान्य गोरगरीब शेतकरी आणि शेतमजुरांना प्रामाणिकपणे आरोग्यसेवा देण्याचे कर्तव्य बजावेन."डॉ. स्वप्नील महादेव सानप यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल स्वप्निलचे मामा संतोष सानप, पत्रकार अविनाश कदम, राजेंद्र लाड, जिशान सय्यद यांनी अभिनंदन केले आहे. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# महागाव नगरपंचायतीच्या भव्य प्रशासकीय इमारतीचा मार्ग मोकळा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची १० कोटींच्या निधीला सकारात्मक साद

**महागाव | प्रतिनिधी**

महागाव शहराच्या वैभवात भर टाकणाऱ्या आणि प्रशासकीय कामकाजाला गती देणाऱ्या स्वतंत्र प्रशासकीय इमारतीचा प्रश्न आता सुटण्याच्या मार्गावर आहे. महागाव नगरपंचायतीसाठी १० कोटी रुपयांचा विकास निधी उपलब्ध करून देण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्य केली असून, तशी ग्वाही त्यांनी आमदार किसनराव वानखेडे व नितीनभाऊ भुतडा यांना मुंबई येथील भेटीदरम्यान दिली. मुख्यमंत्र्यांच्या या तत्पर निर्णयामुळे महागावच्या विकासाला आता नवी झळाळी मिळणार आहे.

प्रलंबित मागणीला मिळाली गती

महागाव नगरपंचायत अस्तित्वात येऊन एक दशक उलटले तरी अद्याप स्वतःची हक्काची आणि सुसज्ज इमारत नव्हती. अपुऱ्या जागेमुळे कर्मचाऱ्यांची होणारी ओढाताण आणि नागरिकांना सेवा मिळवताना सोसावा लागणारा त्रास लक्षात घेऊन, लोकप्रतिनिधींनी आक्रमक पवित्रा घेतला होता. वाढते शहरीकरण आणि भविष्यातील गरजा ओळखून एकाच छताखाली सर्व शासकीय सेवा मिळाव्यात, हा या मागणीमागचा मुख्य उद्देश आहे.

■ **लोकप्रतिनिधींच्या एकत्रित प्रयत्नांना मोठे यश**

या यशाचे सर्व श्रेय आमदार किसनराव वानखेडे आणि नितीनभाऊ भुतडा यांच्या संयमी पण आग्रही पाठपुराव्याला जात आहे. त्यांनी मुंबईत मुख्यमंत्र्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन या प्रश्नाचे गांभीर्य पटवून दिले. त्यांच्या या प्रयत्नांना नगरपंचायतीच्या अध्यक्षा सौ. रंजना दीपक आडे यांच्यासह सर्व नगरसेवक व नगरसेविकांच्या एकजुटीची भक्कम साथ लाभली.

■ **आमदार किसनराव वानखेडे मंत्रालयीन स्तरावर सातत्यपूर्ण पाठपुरावा करून निधी मिळवण्यासाठी पुढाकार.घेतला**

नितीनभाऊ भुतडा महागावच्या विकासासाठी मुख्यमंत्र्यांकडे प्रभावी मांडणी आणि शब्द टाकला.

अध्यक्षा रंजना आडे व सर्व नगरसेवक स्थानिक स्तरावरून निवेदनाद्वारे प्रशासकीय इमारतीची गरज अधोरेखित केली. आधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज प्रशासकीय दालने.

पारदर्शक प्रशासन: नागरिकांना सर्व सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार.

■ **व्यापारी केंद्राचा विस्तार: महागावच्या वाढत्या व्यापाराला पूरक ठरणारी भव्य वास्तू.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित विभागाला या प्रस्तावावर तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दिले असून, लवकरच निधीचे वितरण होणार असल्याचे संकेत मिळाले आहेत. लोकप्रतिनिधी आणि नगरपंचायत पदाधिकाऱ्यांच्या या 'संयुक्त स्ट्राईक'मुळे महागावकरांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून, सर्व स्तरांतून या कामगिरीचे कौतुक होत आहे.


महागाव नगरपंचायतीस स्वतंत्र प्रशासकीय भवन मिळावे यासाठी आम्ही सर्व नगरसेवक व नगरसेविका यांनी एकत्रितपणे सभागृहातून ठराव करून नितीनभाऊ भुतडा तसेच उमरखेड विधानसभेचे आमदार किसनरावजी वानखेडे यांच्याकडे ठोस मागणी केली होती. या मागणीची त्यांनी सकारात्मक दखल घेत सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे आज या कामाला यश मिळताना दिसत आहे.

आज मिळत असलेले हे यश केवळ माझे वैयक्तिक यश नसून महागाव नगरपंचायतीतील सर्व नगरसेवक व नगरसेविकांच्या एकजुटीचे आणि सामूहिक प्रयत्नांचे हे फलित आहे. सर्वांनी एकदिलाने शहराच्या विकासासाठी केलेल्या प्रयत्नांमुळेच हे शक्य झाले आहे.

यापुढेही महागाव शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही सर्वजण असेच एकत्रितपणे काम करत राहू, अशी ग्वाही यावेळी देत नागरिकांचा विश्वास हेच आमचे खरे बळ असल्याची भावना

नगराध्यक्ष सौ रंजना दीपक आडे यांनी व्यक्त केली आहे सौ रंजना दीपक आडे अध्यक्षा नगरपंचायत महागाव.

# लोकरंग




## साप्ताहिक संवाद : सोसलं अनुभवलं ते लिहील.

जळगाव येथील चित्रकार, निवृत्त कलाशिक्षक व लेखक राजू बाविस्कर यांना 'काळ्या निळ्या रेषा' या आत्मकथनासाठी 'साहित्य अकादमी पुरस्कार' जाहीर झाला. त्यानिमित्त त्यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद...

■ **साहित्य अकादमी जाहीर झाल्यानंतर काय भावना आहेत?**

मला पुरस्कार जाहीर झाल्याचे माध्यमांतून कळल्यावर आश्चर्याचा धक्काच बसला. पहिल्याच पुस्तकाची राष्ट्रीय पातळीवर दखल घेतली जाणे स्वप्नवत आहे. खरोखर पुरस्कार मिळाला का, याची खात्री करून घेतली. मी मूळ चित्रकलेतला माणूस. चित्रे काढून विसरून जाणारा. लोकांनी चित्रे पाहावीत, समजून घ्यावीत, त्यांचा आनंद घ्यावा एवढीच अपेक्षा असते. असेच पुस्तकाबाबत आहे. साहित्य अकादमी मिळण्याचा आनंद शब्दांत मांडता येणार नाही.

■ **रेषा' 'काळ्या निळ्या लिहिण्यामागे काय प्रेरणा होत्या?**

आजवर मी गावगाड्यातील, कष्टकरी माणसांची चित्रे काढत होतो. कोणाच्या कधी लक्षातही न राहणारी ही विनचेहऱ्याची माणसे चितारताना अनेक साहित्यिकांशी ओळखी झाल्या. नीळकंठ महाजन, शंभू पाटील यांच्याबरोबर राहता आले. चांगल्या माणसांची बेरीज करत राहिलो. उत्तम पुस्तके वाचत गेलो. विदर्भ साहित्य संघाचे नियतकालिक 'युगवाणी'चे संपादक प्रफुल्ल शिलेदार यांनी माझी चित्रे पाहिली अन् म्हणाले, 'तू जे चित्रांतून सांगतोस, ते तुझे आयुष्य लिहून काढ.' मग 'युगवाणी'त क्रमशः लिहीत गेलो. ते वाचून राजहंस प्रकाशनाच्या दिलीप माजगावकरांचा फोन आला. त्यांनी या लेखांचे पुस्तक करू असं सांगितलं अन् काही दिवसांत आत्मकथन प्रसिद्ध झालं.

■ **तुमच्या आत्मकथनात कुठे कटुता दिसत नाही. एकूण मांडणी सकारात्मक आहे...**

-खरे आहे. कारण सगळे गावकधीच वाईट नसते, हे मला माहीत आहे आणि मी ते अनुभवलेले आहे. चांगल्या माणसांबरोबर राहिल्यावर काही ना काही मिळतेच. माझ्यावर जेवू कित्येकांचे घालण्यापासून अनेक उपकार आहेत. त्यांचे ऋण अमान्य कसे करता येईल ? शाळेतल्या शिक्षकांनी चांगले चित्र काढतोस काढत राहा अशी पाठीवर कौतुकाची थाप दिली नसती तर मी चीत्रकार कुठे झालो असतो?म्हणूनच हि चांगली मानस माझ्यासाठी महत्वाची आहेत.

## दखल : क्लोव्ह डेंटल चायनाचां एकाच दिवसात ४८ नवीन दंत चिकित्सालयांचा विक्रमी शुभारंभ




भारतातील सर्वात मोठे दंत चिकित्सालय नेटवर्क असलेल्या क्लोव्ह डेंटलने आपल्या कार्याची १५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त एकाच दिवसात ४८ नवीन चिकित्सालये सुरू केली आहेत . हा देशातील कोणत्याही दंत चिकित्सा नेटवर्कने केलेला एका दिवसातील सर्वात मोठा विस्तार आहे. या महत्त्वपूर्ण टप्प्यामुळे कंपनीचा विस्तार २६ शहरांमधील ७१५ चिकित्सालयांपर्यंत पोहोचला आहे, ज्यांना १,७०० हून अधिक दंतवैद्य, १,१०० दंत सहाय्यक आणि ५०० हून अधिक व्यावसायिकांचा पाठिंबा आहे.

हा विस्तार भारतातील संघटित दंतचिकित्सेच्या स्थिर वाढीचे प्रतीक आहे, जे क्षेत्र ऐतिहासिकदृष्ट्या विखुरलेल्या एकल-चिकित्सालय व्यवसायांचे वर्चस्व असलेले होते. गेल्या १५ वर्षांमध्ये, क्लोव्ह डेंटलने प्रतिबंधात्मक स्वच्छता आणि नियमित दंतक्षय व्यवस्थापनापासून ते अनेक इम्प्लांट्स आणि स्थिर डेन्चर्स यांचा समावेश असलेल्या जटिल संपूर्ण तोंडाच्या पुनर्वसनापर्यंत, दंत सेवेच्या संपूर्ण श्रेणीमध्ये ३५ लाखांहून अधिक रुग्णांवर उपचार केले आहेत. ऑर्थोडॉन्टिक्स, इनव्हिझलाइन, व्हिसल अलाइनर्स आणि ब्रेसेस यांसारख्या दंत विशेषज्ञांमध्ये एक अग्रणी म्हणून कंपनी उदयास आली आहे.सुरुवातीपासूनच, क्लोव्ह डेंटलने सर्व क्लिनिक्समध्ये सुसंगतता सुनिश्चित करण्यासाठी क्लिनिकल उपचार पद्धती तसेच उपचार कक्षांचेनिर्जंतुकीकरण आणि स्वच्छतेच्या पद्धतींचे मानकीकरण करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. संपूर्ण नेटवर्कमध्ये दर पंधरवड्याला अचानक केल्या जाणाऱ्या ऑडिटद्वारे या मानकांना अधिक बळकटी दिली जाते.

## चला पर्यटनाला : धार्मिक तीर्थक्षेत्रांचा जिल्हा जालना



जालना जिल्हयात महत्वाची/प्रसिध्द पर्यटन केंद्रे विकसित होत आहेत त्यातील काही धार्मिक तीर्थक्षेत्रे, यात्रास्थळे आहेत. जालना शहराची मंमादेवी, आनंदस्वामी मठ, दुर्गामाता मंदीर प्रसिध्द असुन, अंबड येथे मस्त्याच्या आकारातील डोंगरावर मत्स्योदरी देवीचे हेमाडपंथी मंदिर असून, अंबड येथे जवळपास 400 वर्षापूर्वीचा चौघाडा व कल्याणस्वामींचा म्दंग तसेच वेणूबाईचा तानपूरा संगीतप्रेमींनी केलेल्या संग्रहात आढळतो. मराठवाडयातील अष्टविनायकापैकी एक गणपती राजुर येथे आहे. जाम तालुका घनसांवगी येथे समर्थ रामदास स्वामींचे जन्मस्थान असून, त्यांचे मंदीर ही आहे. हेलस तालुका मंठा हे शिल्पकलेचे प्रणेते हेमाद्रीपंत यांचे गाव आहे. भोकरदन तालुक्यातील अन्वा या गावात पुरातन भव्या हेमाडपंथी शिवपंदिर असून, येथे कोरीव शिल्पही आहेत. शिवाय रऊनापराडा ता. अंबड येथे प्रसिध्द दर्गा असुन तेथे दरवर्षी मोठा ऊरुस भरतोअंबड येथील मत्स्योदरी देवीचे मंदिर हे जालना शहराच्या दक्षीणेस 21 कि.मी. अंतरावर स्थित आहे. देविचे मंदिर हे ज्या टेकडीवर स्थित आहे त्या टेकडीचा आकार मासोळी (मत्स्य) सारखा आहे. त्यामुळे या देवीस मत्स्योदरी देविचे मंदिर म्हणून ओळखले जाउ लागले. हे मंदिर जवळपासच्या क्षेत्रातील अत्यंत जुन्या मंदिरांपैकी एक आहे.ऑक्टोबर महिन्यामध्ये नवरात्र महोत्सवाच्या निमीत्ताने दरवर्षी या मंदिरामध्ये मोठी यात्रा भरते

**संकलन-संयोजन : सुबोध रणशेवरे**

# लोकरंजन




## सिनेरंग : 'पिफ्फ'मध्ये तिहेरी सन्मान पटकावलेला 'बाप्या' १५ मे रोजी प्रेक्षकांच्या भेटीला

आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव मिळवलेला आणि अनोख्या संकल्पनेमुळे चर्चेत असलेला 'बाप्या' हा आगळावेगळा मराठी चित्रपट आता प्रेक्षकांच्या भेटीसाठी सज्ज झाला आहे. ''आपली यारी... गावावर भारी!'' अशी हटके टॅगलाईन असलेला हा चित्रपट १५ मे रोजी सर्वत्र प्रदर्शित होणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. वर्किंग आय फिल्म्स प्रस्तुत या चित्रपटाचे नुकतेच प्रदर्शित झालेले पोस्टर सध्या सोशल मीडियावर प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे आणि या वेगळ्या चित्रपटाबद्दलची उत्सुकता अधिकच वाढवत आहे.पोस्टरमध्ये पाठमोरी उभी असलेली व्यक्ती आणि तिला पाहून गावातील इतर पात्रांच्या चेहऱ्यावर उमटलेले आश्चर्य, कुतूहल आणि प्रश्नार्थक भाव अनेक प्रश्न निर्माण करतात. विशेष म्हणजे पोस्टरमधील ती पाठमोरी व्यक्ती म्हणजे अभिनेत्री राजश्री देशपांडे असल्याचे कळतेय. पण ती अशी का उभी आहे? तिच्या आगमनाने गावात एवढे आश्चर्य का निर्माण होते? आणि तिच्या येण्याने नेमके काय बदल घडणार आहेत?या सर्व प्रश्नांची उत्तरे अद्याप गूढ ठेवण्यात आली असून, चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखी वाढवण्यात आली आहे. मैत्री आणि नातेसंबंधांभोवती फिरणाऱ्या या वेगळ्या कथेत नेमके काय घडते, हे जाणून घेण्यासाठी प्रेक्षकांना चित्रपटाची प्रतीक्षा करावी लागणार आहे. 'चित्रपटात प्रतिभावान अभिनेता गिरीश कुलकर्णी झळकणार असून त्यांच्यासह राजश्री देशपांडे, देविका दफ्तरदार, श्रीकांत यादव आणि आर्यन मेंगजी हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत.


■ **योगेश देशपांडे यांचा दिग्दर्शनाच्या पदार्पणासह हिंदी चित्रपटसृष्टीत प्रवेश**

जाहिरात आणि प्रादेशिक चित्रपटांमध्ये एक मजबूत सर्जनशील पाया रचल्यानंतर, चित्रपट निर्माते योगेश देशपांडे त्यांच्या आगामी चित्रपटाद्वारे मुख्य प्रवाहातील हिंदी चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवणार आहेत. या चित्रपटाद्वारे जाहिरात कला आणि सांस्कृतिकदृष्ट्या रुजलेल्या कथाकथनाला जोडणाऱ्या त्यांच्या कारकिर्दीत एक महत्त्वाचा नवा अध्याय सुरू होत आहे. सध्या प्री-प्रॉडक्शनमध्ये असलेला हा प्रकल्प येत्या काही महिन्यांत मजल्यावर जाणार आहे, ज्यामध्ये कास्टिंग सुरू आहे आणि विस्तृत लोकेशन रेकी आधीच पूर्ण झाली आहे.

देशपांडे यांचे हिंदी चित्रपटसृष्टीत प्रवेश जाहिरातींपासून सुरू झालेल्या सर्जनशील प्रवासाच्या नैसर्गिक उत्क्रांतीचे प्रतिबिंबित करते. २००५ मध्ये त्यांच्या कारकिर्दीला सुरुवात केल्यापासून, त्यांनी १०० हून अधिक जाहिरात चित्रपट लिहिले आहेत आणि दिग्दर्शन केले आहे, ज्यामुळे दृश्य कथाकथन आणि ब्रँड कम्युनिकेशनसाठी एक मजबूत प्रतिष्ठा निर्माण झाली आहे. ते रेडिफाइनझेड कॉन्सेप्ट्सचे संस्थापक देखील आहेत, जे नंतर पुण्यातील रेडिफाइनझेड प्रॉडक्शन्स या पूर्ण-प्रॉडक्शन हाऊसमध्ये विस्तारले.त्यांनी ६६ सदाशिव या चित्रपटातून वैशिष्ट्यपूर्ण चित्रपट निर्मितीमध्ये पाऊल ठेवले, ज्यामुळे त्यांनी दीर्घ-स्वरूपातील कथाकथनाच्या कलेत प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी महत्त्वाकांक्षी संगीतमय बायोपिक स्वरगंधर्व सुधीर फडकेसह चित्रपट निर्मिती केली, त्यांच्या आगामी हिंदी चित्रपटातून त्याच सर्जनशील तत्वज्ञानाचे प्रतिबिंब आहे. कोकणातील सिनेमॅटिक लँडस्केप्सच्या विरोधात, हा चित्रपट डिजिटल डिव्हिडेशनच्या मानवी प्रभावाचा शोध घेतो

■ **नाट्यरंग : सलग प्रयोगांसह 'ॲनिमल' रंगमंचावर; सिद्धार्थ जाधव दुहेरी भूमिकेत**

मराठी रंगभूमीवर नव्या नाटकांची चाहूल लागलेली असतानाच 'ॲनिमल' या नाटकाने आणखी एक वेगळी चर्चा रंगवली आहे. अभिनेता सिद्धार्थ जाधव आठ वर्षांनंतर रंगमंचावर पुनरागमन करत असून या वेळी त्यांचा प्रवास केवळ एका प्रयोगापुरता मर्यादित नसून सलग प्रयोगांच्या मालिकेतून प्रेक्षकांसमोर उलगडणार आहे. ठाणे, बोरीवली, वाशी, दादर, पार्ले आणि मुलुंड अशा विविध नाट्यगृहांमध्ये 'ॲनिमल'चे सलग प्रयोग सादर होणार असल्याने या नाटकाकडे रंगभूमीप्रेमींचे विशेष लक्ष लागले आहे.



'ॲनिमल' हे नाटक महेश मांजरेकर लिखित आणि दिग्दर्शित असून सिद्धार्थ जाधव या प्रयोगात दुहेरी भूमिकेत दिसणार आहेत. विशेष म्हणजे ते या नाटकाचे निर्मातेही आहेत. आई-वडिलांच्या स्मरणार्थ सुरू केलेल्या 'ताराराम' या निर्मिती संस्थेची ही पहिली निर्मिती असून, या नाटकातून त्या संस्थेचा रंगभूमीवरील प्रवास सुरू होत आहे.नाटकाची कथा दत्तू या तरुणाभोवती फिरते. छोट्या गावातून मुंबईत आलेला हा तरुण अभिनेता होण्याचं स्वप्न पाहतो. मात्र शहरातील स्पर्धा, अस्थिरता, नात्यांमधील अंतर आणि मानसिक ताण यांच्या घुसमटीत त्याचा प्रवास अधिक गुंतागुंतीचा होत जातो. एका व्यक्तीच्या मनात चालणारी ही झुंज रंगमंचावर एकपात्री शैलीत साकारली जाणार आहे. 'ॲनिमल'च्या या प्रयोगमालिकेबद्दल प्रेक्षकांमध्ये उत्सुकता वाढताना दिसत आहे.

■ **ग्रामीण कलामंच चे हॅशटॅग जंगल राजा रंगभूमीवर सादर**

आजचे प्रतिथयश कलाकार हे अगदी खेड्यापाड्यातूनच घडलेले कलाकार असतात. अशाच ग्रामीण भागातील हौशी कलाकारांना रंगमंच उपलब्ध करून देणारी संस्था म्हणजे ग्रामीण कला मंच. ग्रामीण कलामंच द्वारे प्रथमच ६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी हिंदी नाट्य स्पर्धेत उमेश भेरे लिखित दिगदर्शित हॅशटॅग जंगल राजा या दोन अंकी नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. गिरगाव येथील मराठी साहित्य संघात सादर झालेल्या या नाटकात ग्रामीण कलाकारांनी हिंदी रंगभूमीवर आपली चांगलीच छाप पाडली. हॅशटॅग जंगल राजा हे नाटक आजच्या अत्यंत संवेदनशील अशा पर्यावरणाच्या ऱ्हासावर आधारित नाटक आहे. माणसाने कृतीतून निसर्गाची जी हानी केलेली आहे,आणि त्यामुळेच निसर्गनिर्मित आपत्ती कशा संकट म्हणून उभ्या ठाकलेल्या आहेत यावर गंभीर भाष्य करणारे हे नाटक आहे. अवकाळी पाऊस,वादळ,वन्य प्राण्यांची मानवी वस्तीतील घुसखोरी या ज्वलंत मुद्द्यांवर या नाटकातून प्रकाश टाकण्यात आलेला आहे. लेखक उमेश भेरे यांनी स्वतः नाटकाचे दिगदर्शन,पार्श्वसंगीत आणि नेपथ्य या सगळ्या जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. प्रकाश योजना विराज देसाई यांची असून वेशभूषा मैथिली भेरे यांची आहे. या नाटकात नितीन गाडेकर,सुशील शिरसाठ,महेंद्र जाधव,जानव्ही हाटे,प्रसाद वैद्य,वैशाली पाटील,जागृती बांगर,कुलश्री सुरक्षे,अविनाश दलाल,प्रीतम हजारे,अरुण चौधरी,विजय मांजे,केशव भागडे,भरात फर्डे,या कलाकारांच्या प्रभावी भूमिका आहेत.



**संकलन-संयोजन : सुबोध रणशेवरे**

# नव्या बदलांना स्विकारणाऱ्या शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करणार : मयंक गांधी

## जिथे मने जोडली जातात तिथेच पाणी थांबते : सत्यजित भटकळ






■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी केवळ शेतीत बदल करून चालत नाही, तर विचारांत आणि सामूहिक कृतीतही परिवर्तन आवश्यक आहे. याच दृष्टीकोनातून ग्लोबल विकास ट्रस्टकडून "माती, शेती आणि मती" या त्रिसूत्रीवर आधारित कामाला गती देण्यात येत आहे. आतापर्यंत वैयक्तिक पातळीवर शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यावर भर देण्यात आला होता; मात्र आता गाव पातळीवर एकात्मिक विकास घडवून आणण्याचे मोठे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले आहे. ग्रामीण भागातील वास्तव पाहता, अनेक शेतकरी नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यास संकोच करतात. काही ठिकाणी पाण्याची आणि ज्ञानाची कमतरता, तर काही ठिकाणी भांडवलाचा अभाव ही मोठी अडचण आहे. या पार्श्वभूमीवर ग्लोबल विकास ट्रस्ट शेतकऱ्यांना एकत्र आणून गट पद्धती विकसित करत आहे. या गटांमुळे केवळ उत्पादनातच वाढ होत नाही, तर दर्जेदार शेती, बाजारपेठेतील योग्य दर आणि सामूहिक निर्णयक्षमतेलाही बळ मिळते. या प्रक्रियेतून शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढत असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी मिळत आहे. अशा बदलांच्या प्रवासात शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत देण्याचा निर्धार मयंक गांधी यांनी व्यक्त केला.

पाण्याचे व्यवस्थापन आणि सामाजिक ऐक्य यांचा अतूट संबंध अधोरेखित करताना पानी फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ यांनी महत्त्वपूर्ण मुद्दा मांडला. "जिथे मने जोडली जातात तिथेच पाणी थांबते आणि तिथेच खरी समृद्धी निर्माण होते," असे सांगताना त्यांनी गावातील एकोपा, सहभाग आणि सामूहिक श्रम यांचे महत्त्व अधोरेखित केले. "एकटा ते ऐकता" हे सूत्र केवळ घोषवाक्य नसून ग्रामीण विकासाचा पाया आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. अंबाजोगाई तालुक्यातील मौजे मांडवा पठाण येथे झालेला कार्यक्रम हा या व्यापक विचारांचा प्रत्यक्ष नमुना ठरला. नव्याने केळी लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून आर्थिक व तांत्रिक सहाय्य देण्यात आले. भांडवलाच्या अभावामुळे मागे राहणाऱ्या शेतकऱ्यांना AU Small Finance Bank च्या माध्यमातून कर्जसहाय्य उपलब्ध करून देण्यात आले, तर सिंचनासाठी ३८ शेतकऱ्यांना ठिबक संचांचे वितरण करण्यात आले.

गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर उर्वरित शेतकऱ्यांना मदत देऊन या उपक्रमाला पूर्णता देण्यात आली.

मांडवा पठाण येथील हनुमान मंदिरात झालेल्या या कार्यक्रमातून एक स्पष्ट संदेश समोर आला. शाश्वत शेती आणि समृद्ध गावांसाठी केवळ संसाधने नाहीत, तर सामूहिक विचार आणि एकजूट हीच खरी ताकद आहे. या कार्यक्रमास ग्लोबल विकास ट्रस्टचे ट्रस्टी संजय परमार, सरपंच गणेश रुद्राक्ष, सत्यप्रेम नरवणे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. मांडवा पठाण येथील कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून पापनाशी नदीचे खोलीकरण आणि रुंदीकरण करण्यात येत असून त्यामध्ये GRA घेतले जात आहेत. या संपूर्ण कामाची पाहणी करून त्याच्या प्रत्यक्ष स्वरूपाची पाहणी करण्यात आली. तसेच रेवली, मोहा, करेवाडी आणि कान्नापूर येथील प्रगतिशील शेतकऱ्यांच्या शेतांना भेट देत आंबा, डाळिंब, केळी, लिंबू तसेच रेशीम शेतीची प्रत्यक्ष पाहणी सत्यजित भटकळ यांनी केली. विविध पिकांच्या व्यवस्थापन पद्धती, उत्पादनातील गुणवत्ता आणि शेतकऱ्यांनी अवलंबलेल्या नवकल्पनांची त्यांनी माहिती घेतली. या भेटीदरम्यान त्यांच्या समवेत डि. एल. मोहिते आणि संदीप जोशी उपस्थित होते.

# संभाजी कोंडीबा फुके यांचे हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने दु :खद निधन

## होळकर चौक परिसरात शोककळा

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी):

जुन्या गावभागातील होळकर चौक परिसरातील अतिशय कष्टाळू तथा सर्वपरिचित व्यक्तिमत्त्व कै. संभाजी कोंडीबा फुके यांचे शुक्रवार दि. २० मार्च २०२६ रोजी पहाटेच्या दरम्यान हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय अवघे ३७ वर्ष होते. पहाटेच्या वेळी छातीत दुखून येऊन अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना दवाखान्यात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. संभाजी फुके यांच्या अकाली निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात असून या हृदयाद्रावक दुःखद घटनेने होळकर चौक परिसरामध्ये शोककळा पसरली येथील दादाराव फुके तसेच भाजपचे युवक नेते मुंजा फुके यांचे ते बंधू होत.



याबाबत अधिक माहिती अशी की, कै. संभाजी कोंडीबा फुके हे मनमिळाऊ स्वभावाचे व कष्टाळू व्यक्तिमत्त्व म्हणून जुन्या गावभागात तथा होळकर परिसरामध्ये सर्वपरिचित होते. फुके हे टेलरिंगचा व्यवसाय करून अतिशय कष्टाने आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवायचे. अतिशय साधेपणा, धार्मिक वृत्ती, सामाजिक भान, सामाजिक कार्यात हिरारीने सहभाग अशा स्वभाव गुणामुळे त्यांची परिसरामध्ये स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली होती. येथील दादाराव फुके यांचे बंधू तर भाजपचे युवक नेते मुंजा फुके यांचे ते सख्खे चुलत बंधू होत. शुक्रवार दिनांक २० मार्च २०२६ रोजी पहाटेच्या वेळी छातीत दुखू लागल्याने संभाजी फुके यांना दवाखान्यात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने वयाच्या अवघ्या ३७ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार दि. २० मार्च २०२६ रोजी दुपारी ०२ : ०० वाजता परळी वैजनाथ येथील सार्वजनिक स्मशानभूमी वैकुंठधाम येथे अतिशय शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, दोन मुले, एक मुलगी, भाऊ, भावजय असा भरगच्च परिवार आहे. संभाजी फुके यांच्या अकाली दुःखद निधनाने जुन्या गावभागात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात असून या हृदयद्रावक घटनेने शहरातील होळकर चौक परिसरात शोककळा पसरली आहे. फुके परिवाराच्या दुःखात दैनिक परिवार सहभागी आहे.

# मुस्लिम समुदायला ईद-उल-फित्रच्या हार्दिक शुभेच्छा ; या ईदच्या निमित्ताने अन्याय आणि अत्याचाराविरुद्ध उभे राहणाऱ्यांच्या बलिदानांची आठवण ठेवली पाहिजे : मौलाना इलियास खान फलाही

■ मुंबई वृत्तसंस्था

जमात-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्राचे अध्यक्ष मौलाना इलियास खान फलाही यांनी मुस्लिम बांधवांना आणि सर्व नागरिकांना ईद-उल-फित्रच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. आपल्या संदेशात त्यांनी सांगितले की ईद हा केवळ आनंद आणि उत्सवाचा सण नसून रमजानच्या गहन आध्यात्मिक आणि नैतिक संदेशाची आठवण करून देणारा प्रसंग आहे. त्यांनी म्हटले की पवित्र रमजान महिना आपल्याला पवित्र कुरआनच्या अवतरणाची आठवण करून देतो, जो मानवी समाजात न्याय, करुणा आणि नैतिक जबाबदारी प्रस्थापित करण्यासाठी दिलेला दैवी मार्गदर्शन आहे.

मौलाना फलाही यांनी अधोरेखित केले की आजच्या जागतिक परिस्थितीत, जी संघर्ष, अन्याय आणि अस्थिरतेने ग्रस्त आहे, रमजानचा संदेश विशेष महत्त्वाचा आहे. इस्त्रायल आणि अमेरिकेने इराणवर लादलेल्या युद्धामुळे निर्माण झालेल्या तणाव आणि लष्करी आक्रमकतेचा उल्लेख करत त्यांनी गंभीर चिंता व्यक्त केली की हा संघर्ष व्यापक आणि विनाशकारी प्रादेशिक युद्धात परिवर्तित होऊ शकतो. त्यांनी सांगितले की निरपराध लोकांचे, विशेषतः नागरिक आणि मुलांचे जीवितहानी मानवतेच्या अंतःकरणाला खोलवर दुखावते आणि आंतरराष्ट्रीय मानवीय तत्त्वांचे गंभीर उल्लंघन आहे.



"ईद हा तो काळ आहे जेव्हा आपण आठवतो की कुरआन न्याय प्रस्थापित करण्यासाठी अवतरला गेला आहे. या ईदच्या निमित्ताने आपण त्या सर्वांच्या बलिदानांचीही आठवण ठेवली पाहिजे जे अन्याय आणि अत्याचाराविरुद्ध उभे राहतात," असे मौलाना फलाही म्हणाले. "रमजानच्या शिकवणी मुसलमानांना सत्य, न्याय आणि मानवी सन्मानासाठी उभे राहण्याची तसेच शांतता आणि सलोखा प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करण्याची प्रेरणा देतात." ईदच्या व्यापक संदेशावर प्रकाश टाकताना मौलाना फलाही यांनी मुसलमानांना आवाहन केले की त्यांनी रमजानमध्ये विकसित झालेली आध्यात्मिक शिस्त पुढेही कायम ठेवावी आणि ती समाजाच्या उन्नतीसाठी रचनात्मक कार्यात रूपांतरित करावी. त्यांनी महाराष्ट्रातील मुसलमानांना इस्लामचा सार्वत्रिक संदेश, जो शांतता, न्याय, करुणा आणि मानवसेवेवर आधारित आहे, सादर करण्याचे आणि सर्व धर्मांच्या लोकांबरोबर सहकार्य करत सामाजिक आव्हानांना रचनात्मक पद्धतीने सामोरे जाण्याचे आवाहन केले. जमात-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्राचे अध्यक्ष यांनी देशातील काही शक्तींनी संकुचित राजकीय फायद्यासाठी विभाजन निर्माण करण्याचा आणि द्वेष पसरवण्याचा प्रयत्न केल्याबद्दलही चिंता व्यक्त केली. त्यांनी मुसलमानांना संयम, शहाणपण आणि रचनात्मक सहभागाने प्रतिसाद देण्याचे तसेच देशाच्या लोकशाही आणि संविधानिक मूल्यांप्रती बांधिल राहण्याचे आवाहन केले. "आपण आपल्या सहनागरिकांना देऊ शकणारा सर्वात प्रभावी संदेश म्हणजे शांतता, न्याय आणि सामायिक मानवतेचा संदेश. शांतता ही न्यायाचा परिणाम आहे आणि इस्लाम ठामपणे न्यायाच्या बाजूने उभा आहे." आपल्या समारोपाच्या संदेशात मौलाना फलाही यांनी भारत आणि संपूर्ण जगासाठी शांतता, स्थैर्य आणि समृद्धीची प्रार्थना केली. त्यांनी मुस्लिम समाजाला ईदनंतरही रमजानची भावना कायम ठेवण्याचे आणि न्याय, एकता व मानवसेवेसाठी कार्य करत राहण्याचे आवाहन केले.

# थर्मल राख प्रकरणी मुख्य अभियंत्यांना निलंबित करा; दाऊतपूर ग्रामपंचायतीची चौकशीची मागणी : मिलिंद घाडगे

■ परळी | प्रतिनिधी

राख माफियांना पोषक धोरण राबवल्याचा आरोप करत परळी औष्णिक वीज निर्मिती केंद्राच्या मुख्य अभियंत्यांना तात्काळ निलंबित करावे आणि दाऊतपूर ग्रामपंचायतीच्या कारभाराची चौकशी करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांनी केली. ते 20 मार्च रोजी छत्रपती संभाजी महाराज चौक येथे आयोजित रास्ता रोको आंदोलनात बोलत होते.

या आंदोलनाद्वारे राख टेंडर प्रक्रिया रद्द करावी, कमी दराने राख वाटपामुळे शासनाचा बुडालेला महसूल संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून वसूल करावा, तसेच कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

उपविभागीय अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात दाऊतपूर ग्रामपंचायतीला राख टेंडर कोणत्या नियमांनुसार देण्यात आले, याची चौकशी करावी, गेटपास व स्टॉकची माहिती जाहीर करावी, तसेच मागासवर्गीयांना समान वाटप करावे, अशी मागणी केली आहे. दरम्यान, 2023 मध्ये राखेचा दर प्रति टन 353 रुपये असताना 2026 मध्ये तो 177 रुपयांवर आणल्याने कोट्यावधींचा महसूल बुडाल्या असल्याचा आरोप करण्यात आला. या आंदोलनात मिलिंद घाडगे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

